# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवि/ईबीसी २०१७-१८/२०१८/757                                                        दिनांक :- 17 FEB 2018

प्रति,

संचालक /प्राचार्य,

या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व तंत्रशिक्षण संस्था,

विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना या योजनांचे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीताचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरणे बाबत...

संदर्भ :-१) संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक १८/तंशिस/जाहीरात/२०१८/६० दिनांक १६/०२/२०१८

२) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७ प्र.क्र४६५/तांशि-४ दिनांक १४/०२/२०१८

३) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१६प्र.क्र ५५९/ताशि-४ दिनांक २१/०६/२०१७.

४) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०१७ प्र.क्र.३३२/तांशि-४ दिनांक ७/१०/२०१७

५) महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन शुद्धिपत्र क्रमांक संकीर्ण-२०१७ प्र.क्र.३३२/तांशि-४ दिनांक १३/११/२०१७.

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र १ नुसार मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणा-या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश घेतलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने खालील योजनांसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत.

अ) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

ब) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना.

सोबत तंत्रशिक्षण संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहिरात जोडली असून त्यात नमूद केलेल्या वेळापत्रकानुसार राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना या योजनांचे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीताचे पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत व त्यांची छाननी करणे बाबतची कार्यवाही विहित मुदतीमध्ये करण्यात यावी.

उपरोक्त दोन्ही योजनासाठीचे पात्रतेचे निकष तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. सदर योजनांची माहिती आपल्या संस्थेच्या दर्शनी भागातील सुचना फलकावर कायमस्वरुपी लावावी. तसेच, उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्रमांक ३ ते ५ मध्ये नमुद केलेल्या पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार पात्र विद्यार्थ्यांपैकी एकही पात्र लाभार्थी विद्यार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व संस्था प्रमुखांनी घ्यावी. यासाठी संचालनालयाने जाहीर केलेल्या वेळापत्रकाचे काटेकोरपणे पालन करावे.

Gaikwad
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, मुंबई ४०० ००१

दूरध्वनी क्रमांक ०२२-२२६१७९६९, फॅक्स : ०२२-२२६९०००

E-mail : desk18@dtemaharashtra.gov.in website: www.dtemaharashtra.gov.in

का.क्र १८ /तंशिसं/जाहीरात/२०१८/६० दिनांक: १६.०२.२०१८

**तंत्रशिक्षणातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनाकरिता अर्ज : २०१७-१८**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय संकीर्ण- २०१७/प्र.क्र.४६५/तांशि-४, दिनांक १४ फेब्रुवारी २०१८ नुसार मान्यता प्राप्त निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणा-या आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत (CAP) प्रवेश घेतलेल्या राज्यातील विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने खालील योजनांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

अ. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना :-
ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखापर्यंत आहे अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक व परीक्षा शुल्कांच्या ५० टक्के शिष्यवृत्ती देण्यात येईल.

ब. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना :-

- अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरांतील (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद व नागपूर) संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिमहा रु. ३,०००/- व राज्यातील इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या पाल्यांना प्रतिमहा रु. २,०००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महिन्यासाठी अनुज्ञेय राहील.
- इतर विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु. १.०० लाखापर्यंत असल्यास अशा विद्यार्थ्यांना प्रतिमहा रु. ३००/- इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महिन्यासाठी अनुज्ञेय राहील.

टिप :- १) पात्रतेचे निकष तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ - www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.

२) वरील योजनांची मंजुर रक्कम विद्यार्थ्यांना त्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल. त्या करिता विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड नंबर बँक खात्याशी संलग्नित करुन घ्यावे.

वरील योजनांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत :-
सन २०१७-१८ साठी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी [ज्यांनी www.mahadbt.gov.in या महाडीबीटी पोर्टलवर अर्ज केलेले आहेत अशा विद्यार्थ्यांनी सुध्दा] वरील योजनांचे ऑनलाईन अर्ज www.dtemaharshtra.gov.in या संकेतस्थळावर सुचनांचे पालन करुन संपुर्ण अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकानुसार ऑनलाईन पध्दतीने भरावे.

| अ.क्र. | कार्यपध्द्ती | पासुन | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | सर्व पात्र विद्यार्थ्यांनी www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करणे. | १७-०२-२०१८ | ०३-०३-२०१८ |
| २ | संस्थांनी त्यांच्या लॉगीन आयडी व पासवर्ड चा वापर करुन सर्व अर्जांची छाननी करणे. | २०-०२-२०१८ | १२-०३-२०१८ |
| वेळापत्रकात काही बदल झाल्यास संकेतस्थळावर देण्यात येईल. | | | |

सर्व संस्थाच्या प्राचार्यांना / संचालकांना सुचना देण्यात येते की, उपरोक्त योजनांची माहिती संस्थांच्या दर्शनी भागातील सुचना फलकावर कायमस्वरुपी लावावी, सर्व विद्यार्थ्यांना वरील योजनांची माहिती द्यावी, पात्र विद्यार्थांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरून घेण्यात यावे व भरलेल्या अर्जांची पुढील कार्यवाहीसाठी ऑनलाईन पध्दतीने विहित कालावधीत छाननी करावी.

सही /-
(डॉ. अभय वाघ)
नोडल ऑफिसर तथा संचालक,
तंत्रशिक्षण, म.रा. मुंबई

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीयोजनेंतर्गत आर्थिकदृटया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांसाठी लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

**शासन शुद्धिपत्र क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४**

**मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,**

**हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०००३२.**

**दिनांक: १३ नोव्हेंबर, २०१७**

**संदर्भ** :- शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण -२०१७/
प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ७/१०/२०१७

**शुद्धिपत्र** : शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.संकीर्ण -२०१७/प्र.क्र.३३२/ तांशि-४, दिनांक ७/१०/२०१७ मध्ये पृष्ठ क्र. १० वरील मुद्दा क्र. १० मधील शेवटून दुसऱ्या ओळीमधील "**प्रतिमाह**" हा शब्द वगळण्यात येत आहे.

२. सदर शासन शुध्दिपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१७१११३१३१८५२७७०८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2efbf911362ce57b361b7f36471cb98eb98ed47e7de8b061211b9d7e6e0fc2e3, cn=Madan Maruti Morve
Date: 2017.11.13 15:52:05 +05'30'

( म. मा. मोरवे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव
५. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (कृषी), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सचिव (पशु संवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय) विभाग, मंत्रालय, मुंबई
११. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

व रु.६.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना सक्षम शुल्क नियामक प्राधिकरणाव्दारे निश्चित केल्याप्रमाणे शिक्षण शुल्क महाविद्यालयास देण्यासाठी राष्ट्रीयकृत अथवा अनुसूचित बँकेकडून शैक्षणिक कर्ज घेतले असल्यास त्या कर्जावरील व्याजाची रक्कम ही राष्ट्रीयकृत बँकेकडून देण्यात येणाऱ्या शैक्षणिक कर्जावरील व्याजाच्या मर्यादेपर्यंतची रक्कम ही अनुदान स्वरुपात शासनाकडून संबंधित बँकेस वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयानुसार अदा करण्यात येईल.

७) वरीलप्रमाणे शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीचा देण्यात येणारा लाभ हा शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या निवडक अभ्यासक्रमांसाठीच मर्यादित असेल.

८) तसेच सदरच्या सुधारीत राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विविध प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील शासन मान्यता प्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संबंधित विद्यापीठ, तंत्र शिक्षण मंडळ, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, इत्यादींकडून आकारण्यात येणाऱ्या परीक्षा शुल्काच्या ५० टक्के मर्यादेपर्यन्तचे व शासन मान्यताप्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षेकरीता १०० टक्के परीक्षा शुल्काची प्रतिपूर्ती ही शिष्यवृत्ती स्वरुपात पात्र विद्यार्थ्यांना करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

९) तसेच शासनाने वरील संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत निर्धारित केलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांशिवाय सदरच्या सुधारीत योजनेनुसार वरीलप्रमाणे नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना देखील प्रवेश घेणाऱ्या अल्प भूधारक शेतकरी आणि नोंदणीकृत मजूरांच्या पाल्यांना डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून लागू करण्यात येत आहे.

१०) याशिवाय ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्प भूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित) वार्षिक उत्पन्न रु.१.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांना प्रचलित व नव्याने समाविष्ट करण्यात येणाऱ्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसह बिगर व्यावसायिक आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी/ १२ वी) अभ्यासक्रमांसाठी, शैक्षणिक वर्षातील दहा महिन्याकरीता प्रतिमाह खालील नमूद दराप्रमाणे निर्वाह भत्ता अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.